# लोकशाही

गावचा प्रमुख कोण असतो? सरपंच → सरपंच कोण बनेल हे कसं ठरतं? गावकरी एकत्र येऊन मतदान करतात आणि जास्त मते मिळालेली व्यक्ती सरपंच होते.

- मत कोण देऊ शकतं? गावातील सर्व मतदार (18 वर्षांपुढील).
- स्त्री की पुरुष? हिंदू की मुस्लिम? श्रीमंत की गरीब? - सगळे देऊ शकतात.
- सर्वांच्या मताचे मूल्य वेगवेगळे आहे की समान आहे?
- गरीब मत देईल तर 1 मत आणि अदानी मत देईल तर 1000 मतं असं आहे का?
- म्हणजे एक व्यक्ती एक मत आणि एका मताला एक मूल्य असे आहे!
- बांधकाम मजूर म्हणून काम करणारी यशोदा - निवडणुकांच्या वेळी मतदानाच्या रांगेत जेव्हा उभी राहते, तेव्हा त्याच रांगेत तिच्याबरोबर तिच्या बांधकामाच्या साईटवरचे पुरुष मजूर उभे राहतात. एवढंच नाही तर बांधकामावर देखरेख करणारे मुकादम आणि बिल्डर यांनाही त्याच रांगेत उभं राहावं लागतं. या सगळ्यांच्या मताचं एकच मोल आहे. बिल्डरच्या मताची जेवढी किंमत आहे, तेवढीच यशोदाच्या मताची आहे. आपलं सरकार निवडण्याचा सगळ्यांना समान अधिकार आहे.